**<u>वादीतर्फे साक्षीदार क्रमांक ०२ ची साक्ष</u>**

**मी याव्दारे प्रतिज्ञापूर्वक निवेदन करतो की,**

**<u>उलटतपास शपथेवर प्रतिवादी क्र.१ तर्फे श्री. एस.एस.गवाणकर यांचे मार्फत.</u>**

०९. हे म्हणणे खरे आहे की, मी कल्याण, ठाणे येथे राहतो. हे म्हणणे खरे आहे की, माझा व्यवसाय कल्याण येथे आहे. हे म्हणणे खरे आहे की, माझ्या घरामध्ये माझ्या आजोबांचा फोटो आहे व सदर फोटोवरती गोविंद भुवन मठकर असे नाव लिहीलेले आहे. हे म्हणणे खरे आहे की, माझ्या पुराव्याच्या शपथपत्राच्या परिच्छेद क्र.२ मध्ये नमुद केलेले बोटखत मी पाहिलेले नाही. हे म्हणणे खरे आहे की, मला कुटुंब प्रमुखाबाबत वैयक्तिक माहीती नाही. हे म्हणणे खरे आहे की, पुराव्याच्या शपथपत्राच्या परिच्छेद क्र.२ मध्ये नमुद केलेली स्वतंत्र खाती कुठलीही आहेत याबाबत मला माहीती नाही. हे म्हणणे खरे आहे की, पूर्वी दत्ताराम गोविंद मठकर हा दावा मिळकतीला माझे नाव लावण्यासाठी विरोध करत होता. हे म्हणणे खरे आहे की, मी ज्या मिळकतीबाबत साक्ष देण्यासाठी आलो आहे, त्या मिळकतीचे जुने सर्वे नंबर व हिस्सा नंबर मला सांगता येणार नाही. हे म्हणणे खरे आहे की, गोविंद येसू मठकर असे माझ्या आजोबांचे नाव होते असा दर्शविणारा माझ्याकडे कुठलाही कागदोपत्री पुरावा नाही. हे म्हणणे खरे आहे की, माझ्या आजोबांचे नाव गोविंद भुवन मठकर असे होते. हे म्हणणे खरे नाही की, दत्ताराम हा माझा चुलता असल्याने त्याने तयार केलेल्या शपथपत्रावरती मी फक्त सही केली होती. हे म्हणणे खरे नाही की, पुराव्याच्या शपथपत्राच्या परिच्छेद क्र.६ मध्ये अ.क्र.६ ची नमुद केलेल्या मिळकतीचे सर्वे नंबर व हिस्सा नंबर मला सांगता येणार नाही. माझ्या म्हणण्याप्रमाणे अ.क्र.६ ची मिळकत सर्वे नं.९१ आहे. हे म्हणणे खरे आहे की, प्रस्तुत दाव्यामध्ये वादी, प्रतिवादी कोण आहेत, दावा मिळकती कुठल्या आहेत, दाव्यातील वंशावळ काय आहे याबाबत मला कुठलीही प्रत्यक्ष माहीती नाही. हे म्हणणे खरे आहे की, माझे व दत्तारामचे अलीकडील संबंध चांगले आहेत. साक्षीदार पुनःहून सांगतो की, पुर्वी पासून माझे संबंध चांगले आहेत. हे म्हणणे खरे नाही की, माझ्या चुलत्याला मदत करण्यासाठी आज रोजी

न्यायालयात साक्ष देण्यासाठी आलो आहे. हे म्हणणे खरे नाही की, मी खोटे पुराव्याचे शपथपत्र दाखल केलेले आहे.

श्रवणोत्तर स्वीकृत

सही/–

ठिकाण : मालवण
दिनांक : ०९/१०/२०२३

महेश रा. देवकते
सह दिवाणी न्यायाधीश (क–स्तर), मालवण